आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

**October 2021, Issue-81, Vol-04**

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U22130 MH2013 PTC 250295

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

13) ग्रामीण विकासाकरीता एकात्मिक बाल विकास सेवा योजना
डॉ. दिपाली श्रीराम घोगरे, पातूर जि. अकोला ||56

14) नेहरू रिपोर्ट : एक राजकीय दृष्टिक्षेप
डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव, केडगाव ||60

15) नव्वदोत्तरी ग्रामीण कवितेमधील पर्यावरणाचे चित्रण आणि वास्तव
डॉ. एन.व्ही. शिंदे, माळा ||62

16) पु. शि. रेगे यांच्याकाव्यातील प्रतिमासृष्टी
शोण बाबुराव तांगडे, डॉ. सुदर्शन. ई. दिवसे ||65

17) दलित साहित्य मानवतावादी समाज रचनेची निर्मिती
प्रा. डॉ. नामदेव बापूराव सोडगीर, चापोली ||67

18) विजया राजाध्यक्षांच्या कथांमधील स्त्रीवादी जाणिवेचे विश्लेषण
प्रा. डॉ. देवरे एस.एम., शिरपूर ||71

19) संत भगवान बाबांची शिकवण
प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे, सिंदखेड राजा, जि.बुलडाणा. ||73

20) विनोबा भावे यांचे भूदानविषयक विचार व कार्य
प्रा.डॉ.एन. जी.अडकिने, उमरी जि. नांदेड. ||76

21) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी पत्रकारितेचा इतिहास
प्रा. डॉ. अनिल माने, बिद्री ||78

22) डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञानकथेतील जीवनमूल्ये
संतोष नानाभाऊ पाटील, प्रा.डॉ.माधव कौतिक कदम, नंदुरबार ||80

23) २१ व्या शतकात स्त्रि अस्तित्वाची जाणिव : एक विश्लेषणात्मक आढावा
डॉ. निलेश र. निंबाळकर, जळगांव (जा.) ||83

24) महात्मा फुले यांचे अखंड : एक चिंतन
प्रा. डॉ. शुभांगी परांजपे (डोरले),नागपूर ||88

25) नागपूर शहरातील शिक्षण महाविद्यालयातील इंग्रजी अध्यापन पद्धती....
डॉ. शिरीन शेख, नागपूर ||90

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

19

# संत भगवान बाबांची शिकवण

प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे,
संत भगवान बाबा कला महाविद्यालय,
सिंदखेड राजा, जि.बुलडाणा.

महाराष्ट्राची भूमी हि रत्नाची खान आहे. या भूमीच्या पोटात अनेक रत्नाच्या खाणी आहेत. याच भूमीने अनेक नररत्ने देशाला दिलेली आहेत. त्यामध्ये साधु, संत, ज्ञानी, महर्षी, नेते, समाजसुधारक, लेखक, कवी, उद्योजक याच भूमीने देशाला दिलेले आपणास ज्ञात आहेत.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती | देह कष्टविती परोपकारे ||

या उक्तीचा खऱ्या अर्थाने प्रत्यय आणून देणारे संत भगवानबाबा भगवान बाबांचे जीवन पदोपदी दुःखी, पिडीत, रंजलेले, गांजलेले, गरीब, अनाथ, रोगी, स्त्रीया, निराधार, मुले एवढेच नाही तर मुक्या प्राण्यावर देखिल प्रेमाचा वर्षाव करणारे. त्यांच्या मदतीसाठी दुःख निवारणासाठी आपल्या जिवनाचा अग्नीकुंड संपूर्ण आयुष्यभर बाबांनी धगधगत ठेवला. अविश्रांत बाबांनी समाजाची सेवा केली.

जया अंगी मोठेपण | तया यातना कठीण ||

समाजाची सेवा करीत असतांना अनिष्ट रुढीचे, प्रथांचे उच्चाटन करतांना बाबांना अनेक हाल अपेष्टांचा सामना करावा लागला. समाज विघातक प्रवृत्तीशी संघर्ष करावा लागला. अनेकांनी बाबांना कलंकित करण्याचा प्रयत्न केला. अनेक कटु प्रसंगांना या महापुरूषास तोंड द्यावे लागले. अशा संघर्षमय अवस्थेत ही बाबा शुक्रताऱ्या प्रमाणे अढळ, शांत, सयंमी व धैर्याने तोंड देत राहिले. सर्व प्रसंग त्यांची सत्वरीक्षा बघणारे होते. शेवटी सर्व प्रसंगात त्यांना यश लाभले. जणु या प्रसंगामुळे बाबांचे चारित्र्य उजळून निघाले होते. एक प्रकारे अलौकीकतेची झालरच त्यांच्या चारित्र्याला मिळाली होती. शत्रुवरही मित्रा प्रमाणे प्रेमाचा वर्षाव करुन त्याचे मन व मतपरिवर्तन करण्याची किमया फक्त बाबां जवळच होती.

पुत्र व्हावा ऐसा गुंडा | त्याचा तिन्ही लोकी झेंडा ||

आपल्या अलौकीक कार्याने, जनमन ढवळून टाकणाऱ्या किर्तनाने आणि अजोड अशा धैर्याने संकटांना सामोरे जावून समाज परिवर्तनाचा महामेरू ठरलेल्या, सर्वांच्या गळ्यातील ताईत बनलेल्या संत भगवान बाबांचा जन्म श्रावण ५, शके १८१८ रोज सोमवारला म्हणजे २९ जुलै १८९६ ला सकाळी सुर्योदया वेळेस झाला. सुर्य ज्या प्रमाणे अंधाराचा नायनाट करुन प्रकाशरुपी अभय या सृष्टीवरील मनुष्यप्राणी व इतर सजिव प्राण्यांना देत असतो त्याच प्रमाणे बाबांचा जन्म देखिल परकीय यवन, चोर, दरोडेखोर, अज्ञान, अन्याय, अत्याचार, जूलूम व अनिष्ठ प्रथा या विरुध्द उगवलेला एक मानवरुपी सुर्यच अशी भावना भगवान बाबांच्या जन्मासमयी जानकार व वयोवृध्द व्यक्तींच्या मनात निर्माण झाली होती. ती सार्थ देखिल ठरली. बाळ जन्माचा आनंदोत्सव म्हणून तुबाजी पाटलांनी आपला वाडा १०८ दिव्यांनी प्रजोलित व सुशोभित केला होता.

आई कौतिकाबाई आणि वडील तुबाजी पाटील या उभयंतांना ग्यानबा, ज्ञानदेव, बाबुराव, शंकरराव यांच्या नंतर झालेले पाचवे अपत्य म्हणजे बालपणीचे आबाजी, आजचे संत भगवान बाबा. बाळ जन्माला आल्यानंतर त्याला बघण्यासाठी सुपे सावरगाव (ता.पाटोदा, जि.बिड) मधील आया, बायांनी खुप गर्दी केली होती. बाळाला बघून प्रत्येकीला आनंद होत होता. बाळांचे लोभसवाने रुप सर्वांच्या नजरा आकर्षित करुन घेत होते. बाळाचे रुप बघून एक जाणकार आजीबाई उद्गारली, बाळाचा तोंडवळा अगदी आजोबा सारखा दिसतोय म्हणून बाळाचे नाव आबाजी ठेवण्यात आले. माता कौतिकाबाई पुत्ररत्नाच्या जन्माने सुखावल्या होत्या. त्यांनी मनोमन ईश्वराजवळ मागितलेल्या मागण्या पुत्राकडून पूर्ण होतील. अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती. पुढे याच महापुरूषाने आपल्या दैदिप्यमान तेजाने संपूर्ण समाज प्रकाशमय केला, याचा अनुभव आज आपण घेत आहोत.

आयुष्यभर समाजाची सेवा करत असतांना, किर्तनरुपी आपल्या शस्त्राने समाजपरीवर्तन करत असतांना बाबांनी समाजाला जी शिकवण दिली ती खुप अनन्यसाधारण आहे. अनेक महापुरूषांच्या शिकवणीत व बाबांच्या शिकवणीत बरेचशे साम्य असलेले त्यांच्या शिकवणी वरुन दिसून येते. बाबांच्या शिकवणित समाजा विषयी असलेली तळमळ व समाज विकासाची ओढ दिसून येते.

**१) मानव जन्माचे महत्त्व :-**

संत भगवान बाबा म्हणतात, मनुष्य देह काही पुन्हा-पुन्हा मिळत नाही. बुध्दी हे मानव समाजाचे एक वैशिष्ट्य आहे. आपणास मानव जन्म मिळाला हे आपले भाग्य समजावे व समाजाच्या भल्यासाठी व उत्कर्षासाठी सतत प्रयत्नरत राहिले पाहिजे व मानव जन्माचे सार्थक प्रत्येकाने करुन घ्यावे.

**२) लोभापासून मुक्ती:-**

लोभ म्हणजेच लाभ, अतिरिक्त मिळकत, अति हाव. मानवास अति हाव असल्यास तिच्या पूर्ततेसाठी तो अहर्निश धडपडत असतो. त्यामुळे तो मानसिक शांतता गमावून बसतो. चिडचिड, अति

राग, इतरांचा व्देश करु लागतो. प्रसंगी तो समाजविघातक मार्गाचा अवलंब ही करतो. त्यामुळे समाज स्वास्थ्य धोक्यात येते. म्हणून बाबा लोभापासून मुक्त राहण्याचा मार्ग सतत सांगत असत.

**३) अति इच्छा दुःखाचे उगमस्थान :-**

कोणतीही गोष्ट मिळविण्याची अति इच्छा असेल आणि ती गोष्ट मिळविण्यात आपण अयशस्वी ठरलो तर माणुस दुःखी बनतो. बाबा आपल्या किर्तनातून अति व अवास्थव इच्छे संदर्भात मार्गदर्शन करुन अति इच्छा दुःखास कशा कारणीभूत आहेत हे समप्रमाण श्रोत्यांना समजावून सांगत.

**४) समाधानाने जगण्याचा सल्ला :-**

जिवनात समाधानास अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. संसाररुपी या सागरात जिवन जगत असतांना मानसिक समाधानास खुप महत्त्व आहे. जे मिळाले आहे आणि आपण जे मिळविणार आहोत या विषयी मानवाच्या मनात समाधानाची भावना असल्यास परस्परात व्देश, तिरस्कार, कलह होणार नाही. समाजात सौख्य व आनंद निर्माण होईल, व्यक्ती, समाज व देशाचा विकासात समाधान महत्त्वाचे आहे.

**५) परपिडनाने पाप लागते :-**

परपिडा म्हणजे दुसऱ्याला काया, वाचा व मनाने त्रास देणे, त्याचे अहित चिंतने, त्याला दुःख होईल असे वागणे. अशी कोणत्याही मानवाची कृती असेल तर त्याच्या अशा विघातक कृत्य जरी कुणाच्या नजरेस जरी पडत नसले तरी बाबा सांबतात अशा त्याच्या वागण्याने तो पापाचा संग्रह करीत असतो. तो स्वतःच्या नुकसानिस कारणीभूत ठरत असतो. त्यामुळे कुणालाही आपल्या वागण्याने कळतच नव्हे तर नकळतही पिडा देवू नये.

**६) परोपकार करा :-**

परोपकारावर बाबांचा खुप भर असे. एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ या नुसार मानवाने सदोदीत परोपकाराची भावना मनात ठेवून, समाजातील रंजले, गांजले दीन, दुःखी यांना मदत व सहकार्य करुन मानवतेचे कल्याण करावे असे बाबा सांगत.

**७) रामनामाचा मंत्र :-**

रामनामावर बाबांची नितांत श्रध्दा होती. रामनाम व्यक्तीच्या मुखात असेल तर कोणतेही संकट त्याच्यावर येवू शकत नाही. आलेल्या संकटापासून त्याची मुक्तता होवू शकते. एकंदरीत मानवाच्या प्रगतीत, मानसिक शांततेत व विकासात रामनामाचे अत्यंत असाधारण असे महत्त्व असल्याचे बाबांचा ठाम विश्वास होता. रामावर, रामनामावर त्यांची अढळ श्रध्दा होती.

**८) तुळशिची माळ घाला :-**

भक्ती संप्रादायात व एकंदरीत मानवी जिवनात तुळशीमाळेला खुप महत्त्व असल्याचे बाबा पटवून देत. माणुस काया, वाचा, मनाने निर्मळ रहावा, शुध्द रहावा, पापापासून, अनिष्ट कामापासून दुर रहावा, एक सज्जन व सुदृढ समाजासाठी प्रत्येकाने तुळशी माळ गळ्यात घालणे आवश्यक असल्याचे बाबा पटवून देत. बालपणी त्यांना स्वतः पंढरपुरास जावून स्वतः माळ घातली. घरी अल्यानंतर ते गावातील मंदिरावरच थांबले. जो पर्यंत घरची सर्व मंडळी माळ घालणार नाही तो पर्यंत मी घरी येणार नाही. असा हट्टच त्यांनी धरला. तो पूर्ण झाल्यावरच ते घरी गेले. बालपणापासूनच बाबांना तुळशीमाळेचे महत्त्व समजले होते.

**९) अभक्ष भक्षण करु नका :-**

माणुस ज्या प्रकारचे अन्न भक्षण करेल त्याच प्रमाणे त्याचा स्वभाव बनत असतो. अशी बाबांची ठाम समजुत होती. त्यामुळे मास, मत्सी, असलेल्या पदार्थांचे सेवन केल्यास माणुस स्वतःचे जिवन उध्दवस्त करत असतो. त्याच बरोबर दुसऱ्याचे जिवन ही बरबाद करत असतो. समाजाची हानी करत असतो. म्हणून मानवाने अभक्ष असे भक्षण करु नये. असे बाबा सर्वांना सप्रमाण पटवून देत.

**१०) मुक्या प्राण्यावर दया :-**

अज्ञान, अंधश्रध्दा, देवभोळेपणा यामुळे देवाच्या नावाने चालत आलेली अनेक ठिकाणची मुक्या प्राण्यांची हत्त्या, अनेक ठिकाणच्या यात्रेत चालणारी प्राण्याची कत्तल बाबांनी बंद केली. चिंचाळा गावात बळी दिल्या जाणाऱ्या गायीचे उदाहरण सर्वानाच ज्ञात आहे. मुक्या प्राण्यासाठी बाबांनी स्वतःचा जिव पणास लावला होता. हिच त्यांची खरी भुतदया होती.

**११) भुकेल्यांची भुक भागवा :-**

अन्नदाने दृढायुषी | उदक दाने सर्वसुखी ||

अन्नदान करण्यात बाबा खुप आग्रही असत. गडावर आलेल्या कोणालाही बाबा जेवन केल्याशिवाय जावू देत नसत. बाबा म्हणत, लोकांना उपदेश करावयाचा असेल, काही सांगावयाचे असेल तर त्यांना उपाशी ठेवून चालणार नाही. उपाशीपोटी तत्वज्ञान कामाचे नाही. तेव्हा त्यांना अगोदर जेवन द्या. दिंडीत मुक्कामाच्या ठिकाणी बाबा वारकऱ्यांच्या भुक भागविण्याचा पायंडा समाजाला पटवून दिल्याची अनेक उदाहरणे त्यांच्या चरित्रात बघावयास मिळातात.

**१२) तहानलेल्यांची तहान भागवा :-**

अन्नदानाचा बाबांचा जसा आग्रह असे तसाच तहानलेल्याच्या तहाने विषयी पाणी म्हणजे जिवन. माणुस एक वेळ जेवना शिवाय काही दिवस जगु शकेल. परंतु पाण्याशिवाय तो जगु शकणार नाही. तत्कालीन समाजात अनेक अस्पृश्य जमातींना पाणी देखिल मिळत नव्हते. त्यांना पाणी मिळावे, मुक्या प्राण्यांना पाण्याची सोय व्हावी

म्हणून बाबांनी तळमळीने प्रचार केला. अनेक गाव व वाड्यांचा पाण्याचा प्रश्न स्वतः बाबांनी सोडविला.

**१३) दारु पिवू नका :-**

दारु आणि कोणतेही नशेचे व्यसन करण्यास बाबांचा कडाडून विरोध होता. दारु हे सर्वनाशाचे कारण आहे. दारु मुळे अनेक व्यक्ती व कुटुंबे बरबाद झाल्याचे बाबा किर्तनातून पटवून देत. दारुचे दुष्परिणाम समजावून सांगत. वेळप्रसंगी दारु पिणारास शिक्षा हि करत.

**१४) मासाहार करु नका :-**

बाबांचा मुक्या प्राण्या विषयी असलेला जिव्हाळा व प्रेम जगा वेगळे होते. याच मुक्या प्राण्यांना मारुन माणुस खातो. यात्रेत व नवसात कोंबडे, बकरे, गायी, रेडे यांचा बळी दिल्या जातो. तो केवळ जिभेचे चोचले पुरवावे म्हणून. जर मानवाने मासाहारच केला नाही तर निष्पाप, मुक्या प्राण्याचा जिव जाणार नाही. म्हणून मासाहार करु नका. अभक्ष भक्षण करु नका अशी शिवकण बाबा देत.

**१५) मुक्या प्राण्यात देवाचे अस्तित्व :-**

अज्ञानी, अडाणीच नव्हे तर साक्षर व शिक्षित व्यक्तीला जेव्हा देव म्हणजे काय ? तो कोठे भेटतो हे कळले नव्हते. त्यांना बाबा सांगत देव दगडात नाही, देव मुर्तीत नाही तर देवाचे अस्तित्व हे मुक्या प्राण्यात आहे. त्यांचे पालन पोषण करा, त्यांना अभय द्या, त्यांच्यावर प्रेम करा. या मुक्या प्राण्यातच देव, ईश्वर आहे. त्यांच्यामध्येच देवांचे अस्तित्व बाबांना जाणवत असे.

**१६) लहापासून दुर रहा :-**

कलह, वाद, संघर्ष, युध्द यामुळे व्यक्ती, समाज, देश व राष्ट्र यांची हमेशाच हानी झाल्यांची उदाहरणे इतिहासात सापडंतात. तेव्हा कुठल्याच कारणाने कलह न होता. समाजात शांतता, संयम व शिस्त रहावी म्हणून बाबा कलहापासून दुर राहण्यास भक्तगणांना सांगत.

**१७) आई-वडीलांचा सांभाळ करा :-**

**मनुष्याचे खरे दैवत, खरे देव हे आई वडीलच. आई** वडीलांमुळेच हा मानव जन्म आपणास मिळाला. त्यांनी केलेल्या पालन पोषणामुळे व संस्कारामुळे माणवत्व प्राप्त झाले. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी आई वडीलांचा मानपान सांभाळणे, त्यांची अज्ञापालन करणे व म्हातारपणात त्यांचा योग्य तो सांभाळ करण्याचे काम प्रत्येक मुलाचे किती महत्त्वाचे आहे, ते बाबा पटवून देत. मातृऋण काय असते ते समाजावून सांगत.

**१८) अंधश्रध्देचा त्या करा :-**

समाजात जी अंधश्रध्दा, अनिष्ट रुढी, परंपरा आहेत, ज्यामुळे मानवाची व माणवी समाजाची अधोगती होते, ज्यामुळे समाजाची प्रगती होत नाही, अशा सर्व खुळचट अंधश्रध्देचा त्याग करण्याची बाबा शिकवण देत. या अंधश्रध्देतून मानव मुक्त करण्याचा जणु चंगच त्यांनी बांधला होता.

**१९) कुणाचाही व्देश करु नका :-**

मानव जन्म हा खुप अनमोल आहे. आपण सर्व एका ईश्वराची लेकरे आहोत. सर्व समान आहोत. शिवाय मानवास बुध्दीची देणगी लाभली आहे. त्यामुळे मानवाने कुणाचा व्देश, हेवा, मत्सर, तिरस्कार न करता सर्वांनी बंधुभावाने व गुण्यागोविंदाने नांदावे अशी शिकवन बाबा सदोदीत देत.

**२०) जातीच्या बंधनात अडकू नका :-**

मानव जन्मतः समान आहे. जाती जातीच्या भिंती या मानव निर्मित आहे. जन्मतः कुणी श्रेष्ठ-कनिष्ठ नाही. कुणी निच नाही कुणी उच्च नाही. त्यामुळे जातीच्या बंधनात न राहता सर्वांना निसर्गतः विकासाची संधी मिळाली पाहिजे. जाती बंधनामुळे होणारे अन्याय अत्याचार थांबले पाहिजेत. समानतेच्या, बंधुभावाच्या तत्वाची पेरणी मनामनात करण्याचे कार्य बाबांनी आयुष्यभर केले.

**२१) मुलांना शाळा शिकवा :-**

शिक्षणाचे महत्त्व बाबांनी ओळखले होते. शिक्षण ही सर्वांगीण विकासाची चाबी असल्याचे बाबांनी पटवून दिले. प्रसंगी उपवासी रहा, खुप मेहनत करा. पण मुलांना शिकवा हा मुलमंत्रच त्यांनी जनमाणसाच्या मनावर बिंबविला. त्यासाठी त्यांनी गडावर व गडाच्या आसपासच्या परीसरात शाळा सुरू केल्या. गरीब मुलांना वह्या, पुस्तके, कपड्याचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या जेवनाची सुविधा ही शाळेतच केली. शिक्षणाचा महिमा ते प्रत्येक किर्तन व प्रवचनातून सतत सांगत असत.

**च्मरावे परि किर्ती रुपी उरावेछ या उक्ती नुसार**

अशा अनेक प्रकारे समाजाचे सतत प्रबोधन बाबा संपूर्ण आयुष्यभर करीत होते. समाजाचा विकास साधण्याचा जणु विडाच त्यांनी उचलला होता. एकच माणुस समाजाच्या अनेक पातळ्यावर शुर योध्दयासारखा दिवसरात्र झिजत होता. सारखा लढत होता. प्रापंचिक सुखाचा त्याग करुन समाजाच्या सुखाचा विचार करीत होता. एवढेच नाही तर मृदंगाचार्य, गायनाचार्य, किर्तनकार, प्रवचनकार, समाजप्रबोधनकार म्हणून ही बाबांची खाती सर्वदूर पसरली होती. अशा या अष्टपैलू व्यक्तीमत्त्वाचा पोटदुखीच्या आजाराने दिनांक ९ नोव्हेंबर २००३ ला रात्री १ वाजता धगधगता अग्नीकुंड शांत झाला. तो शरीराने जरी शांत झाला असला तरी आपल्या कर्तृत्त्वाने चिरकाल जनमाणसाच्या मणावर अधिराज्य गाजवित राहिल. बाबांची किर्ती अजरामर राहिल. प्रेरणादायी राहील.

**या थोर राजयोगी महंतास मानाचा मुजरा.**